# सहसंचालक, तंत्र शिक्षण, प्रादेशिक कार्यालय,

## शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७
Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७११३

---

फॅक्सद्वारे /ई-मेलव्दारे
महत्वाचे
प्रति,

क्र.विकाअ/शिक्षण/थेट द्वि.व.प्र./२०१२/ 2759
दिनांक :- 08/8/2012

प्राचार्य,

१. सर्व शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये (पदवी)
२. सर्व शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये (पदवी)

**विषय :-शैक्षणिक वर्ष २०१२-१३**
थेट व्दितीय वर्ष **अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र** पदवी अभ्यासक्रम प्रवेशाकरीता उपलब्ध जागा कळविण्याबाबत.

**संदर्भ :-** १. मा.संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांचे पत्र क्र.२A/ADM/२०१२/१७२१ दिनांक २६/०७/२०१२.
२. मा.संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांचे पत्र क्र.२A/ADM/२०१२/१८८२ दिनांक ०२/०८/२०१२.
३. या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्र. विकाअ/शिक्षण/थेद्वप्र/२०१२/२१५६ दिनांक ०८/०८/२०१२.

उपरोक्त संदर्भीय पत्रांन्वये शैक्षणिक वर्ष २०१२-१३ करीता थेट व्दितीय वर्ष **अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र** पदवी अभ्यासक्रम प्रवेशाकरीता आपल्या संस्थेत उपलब्ध असलेल्या जागा संचालनालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अपडेट करण्याबाबत निर्देशीत आहे. संचालनालयाचे संकेस्थळावर संस्थेत उपलब्ध असलेल्या रिक्त जागांचा अचूक तपशिल भरण्याची जबाबदारी संस्थेची असून तसे न करणा-या संस्थांवर कार्यवाही करण्यात येईल त्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही आपल्या स्तरावर पार पाडावयाची आहे. संदर्भ २ प्रमाणे दिलेल्या मूदतीत सर्व संबंधीत संस्थांनी थेट द्वितीय वर्षाला CAP व्दारा प्रवेशासाठी उपलब्ध जागाची अभ्यासक्रम निहाय संख्या Online Update व Confirm कराव्यात. संदर्भीय पत्र ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आपल्या संस्थेमार्फत थेट व्दितीय वर्ष प्रवेशाकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या जागांची निश्चिती या कार्यालयामार्फत तज्ञ तपासणी समितीव्दारा करावयाची आहे. तरी संस्था प्रमुखाने प्रमाणित केलेली माहिती पुस्तिकेतील नियम क्र.३.१ मधील संपूर्ण माहिती आवश्यक त्या सर्मथनार्थ खालील नमुद केलेली आवश्यक कागदपत्रे रिक्त जागांच्या निश्चितीच्या पृष्ठयर्थ या कार्यालयास प्रतिनिधी सोबत सादर करावी. प्रतिनिधी यांना सदर माहितीबाबत संपूर्ण जाणिव असने आवश्यक आहे, जेणेकरुन समितीस आवश्यक माहिती पूरविण्यास समर्थ असतील. संस्थांनी आवश्यक ती सर्व संबंधित कागदपत्रे समितीस न पुरविल्यास, होणा-या परिणामास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१. मुळ दस्ताऐवजासह जसे AICTE चे मान्यता पत्र २०१२-१३.
२. संचालनालयाव्दारे प्रमाणित प्रथम वर्ष गुणवत्ता यादी. (२०११-१२)
३. संचालनालयाव्दारे प्रमाणित केलेली TFWS/JK/GOI कोटा प्रवेशित यादी.
४. विद्यापीठ गॅझेट प्रतः- व्दितीय वर्ष प्रवेशास पात्र विद्यार्थ्याची नांवे Mark / Highlighted केलेली असावीत.
५. विद्यार्थ्यांचे शाखा बदल किंवा संस्था बदल करीताचे अर्ज, त्यांची यादी, तसेच संबंधीत विद्यार्थ्याने फी भरल्याबाबत पुरावा, मुळ T.C., गुणपत्रिका, जातीचे प्रमाणपत्र इत्यादी.
६. शाखा बदलाबाबतचे संस्था स्तरावरील आदेश.
७. रिक्त जागांचा गोषवारा.
८. ईतर संबंधीत दस्तावेज.

तरी उपरोक्त नमुद केलेली मुद्यांबाबतची माहिती आणि संदर्भामध्ये नमुद केल्याप्रमाणे संचालनालयाच्या संकेतस्थळावर रिक्त जागांबाबत ऑनलाईन नमूद करण्यात आलेली स्थिती (Report) प्राचार्यांच्या सही, शिक्क्यासह सादर करावी. सदर कामाकरीता जाणकार अधिकारी/कर्मचारी यांची प्रतिनियुक्ती **दिनांक १३ ऑगस्ट २०१२ व १४ ऑगस्ट २०१२ रोजी सकाळी ११ वाजता** या कार्यालयात करावी. दिलेल्या मुदतीत संस्थांनी उपरोक्त प्रमाणे कार्यवाही न केल्यास होणा-या परिणामास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

सहसंचालक तंत्र शिक्षण,
अमरावती

**प्रत :-** प्रक्रिया योजक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय , अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता
E:\Shikshan\Shikshan\ADMISSION 2012-13\DirII-Engg-pha.Degree 2012-13.doc